











# ॲम्ब्युलंस लोकार्पण सोहळा

रुग्ण अत्यवस्थ अवस्थेत पोहोचल्यावर त्यावेळी रुग्णवाहिका उपलब्ध होणे अत्यावश्यक असते. सर्वसामान्यांचा विचार करुन मोफत रुग्णवाहिका सुरु केली आहे. त्या माध्यमातून नागरिकांना गरजेच्या वेळी विनामुल्य सेवा दिली जात आहे. या रुग्णवाहिकेमुळे वेळेत उपचार मिळल्याने अनेकांचे प्राण वाचले आहेत.






# व्यापाऱ्यांसाठी मोफत Antigen टेस्ट

कोरोना काळात न-हे परिसरातील कोरोना आटोक्यात येत नव्हता. तसेच, व्यापारी हा समाजातील महत्वपुर्ण घटक आहे. ग्राहकांना माल खरेदी करताना व्यापारी वर्गापासून कोणता संसर्ग होऊ नये म्हणून भुपेंद्रजी यांनी सर्वात आधी व्यापारी वर्गांची मोफत अँटिजेन टेस्ट करुन घेतली. यामध्ये काही व्यापारी कोरोना पॉझिटिव्ह सापडले त्यामूळे पुढचा मोठा धोका टळला.

सेवा संकल्प विकास










# आरोग्य तपासणी शिबीरांचे आयोजन

आजकाल धावपळीचे जीवन आणि बदललेली जीवनशैली यामूळे त्याचे नागरिकांच्या आरोग्यावर अनेक दुष्परिणाम होत आहेत. परिणामी, वेळेत संपुर्ण आरोग्याची तपासणी होणं काळाची गरज आहे. म्हणून, भुपेंद्रजी यांनी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करुन मोफत आरोग्य तपासणी केली.

सेवा संकल्प विकास










# कोरोना काळात नागरीकांना अन्नधान्य वाटप

कोरोना काळात लॉकडाऊनमुळे हातावर पोट असलेल्या लोकांचे अतोनात हाल झाले. संसार उघड्यावर पडले. त्यांना सर्वतोपरी मदत पोहोच केली. त्यांच्या परिवाराला आधार मिळाला. त्यांच्या या संवेदनशील कृतीची समाजातील सर्व स्तरातून कौतुक झाले.

सेवा संकल्प विकास









# कोविड योध्यांचा सन्मान

कोविड काळात अनेक कोविड योध्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. जीवाची बाजी लावून त्यांनी केलेले प्रयत्न व पार पाडलेली जबाबदारी याचा त्यांना उचित मानसन्मान मिळणे आवश्यक होते. त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.











## एक मदत अशीही

मा.निलेशजी लंके यांनी उभारलेल्या कोविड सेंटर मा.शरदचंद्रजी पवार आरोग्य मंदीराला भेट देवून त्यांचे मार्गदर्शन घेतले. फुल ना फुलाची पाकळी म्हणुन ११,१११ /- रू ची आर्थिक मदत सुपुर्द केली. आमदार निलेशजी लंकेंनी शतशः आभार मानले.

## एकूण २.५ कोटी रूपयांची हॉस्पिटल बीले माफ करून घेवून गरीबांस मदत

नऱ्हे येथील अली शेख या व्यक्तीस कोरोना मुक्त होवून डिस्चार्ज झाला. पण त्यामागे खुप मोठी समस्या होती ती हॉस्पिटलच्या बिलाची पारनेरहून घरी परतलो तेव्हा हॉस्पिटलला प्रत्यक्षजावून तेथील अधिकारी व मॅनेजमेंटशी संवादसाधून तब्बल ७ लाख बील माफ करून घेतले. घरी परतल्यावर त्यांनी घरी यायचा आग्रह धरला. त्यांना भेट दिल्यावर माझे आभार मानले.व सर्व कुटुंब आपले ऋणी आहोत असा आशिर्वाद दिला.









## राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त मोफत लसीकरण

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून भुपेंद्रजी यांनी मोफत लसीकरण शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचा शुभारंभ पुणे राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष श्री. प्रशांत जगताप, माजी उपमहापौर श्री. दिपकभाऊ मानकर, मा.पंचायत समिती सदस्या प्रभावती भुमकर यांच्या शुभहस्ते केला.

सेवा संकल्प विकास











## रक्तदान शिबिरांचे आयोजन

रक्तदान केल्याने अनेकांचे जीव वाचू शकतात.
याचा विचार करुन भुपेंद्रजी हे वर्षातून दोन वेळा
भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करतात.
त्यातून रुग्णांना प्लाझ्मा व रक्त मोफत उपलब्ध
करुन दिले. त्यांनी आयोजित
केलेल्या आजपर्यंतच्या रक्तदान शिबिरांमध्ये हजारो
जणांनी सहभाग नोंदविला आहे. तसेच एका
अज्ञात इसमास रक्ताची अत्यावशक्ता होती.
तेव्हा त्यांना त्याच ठिकाणी रक्त उपलब्ध करून दिले.

सेवा
संकल्प
विकास










## लोकप्रिय आमदार मा.श्री.सुनिल शेळके यांच्या वाढदिवसानिमित्त लसीकरण

मावळ विधानसभेचे आमदार
श्री.सुनीलआण्णा शेळके यांच्या
वाढदिवसानिमित्त भुपेंद्रजी यांनी ११००
नागरीकांसाठी मोफत लसीकरण मोहीम
आयोजित केली होती.
यावेळी आमदार सुनिल आण्णा शेळके,
पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सेवा
संकल्प
विकास








## शिरपेचात अजुन एक तुरा

समाजकार्यासाठी दिला जाणारा पुण्यातील एक सर्वोच्च पुरस्कारांपैकी एक लोकशाही पुणे रत्न सन्मान २०२१ ने मा.दिलीपजी वळसे पाटील (गृहमंत्री : महाराष्ट्र राज्य) व मा.श्री.रोहीतदादा पवार यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. या वेळी मा.रूपालीताई चाकणकर व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार देण्यात आला.

सेवा संकल्प विकास









# दुर्गसफर व दुर्गसंवर्धन मोहीम

शिवप्रभुंच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभुमीत साहजिकच शिवप्रेमी असतातच. तसाच मीदेखील एक शिवप्रेमी आहे. शिवजयंतीबरोबरच दुर्गसंवर्धन व दुर्गसफर करण्याचे काम अनेक वर्ष शिवराज्य समुह व मित्रपरिवाराकडून नेहमी राबविले जाते.

सेवा संकल्प विकास

# मोरेंचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा

नऱ्हे (आपण सारे)



पुण्यातील नऱ्हे येथील सामाजिक कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस भूपेंद्र भाऊ मोरे यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला.

कोरोनामुळे लोकांना होणारा त्रास लक्षात घेऊन सुमारे १२०० नागरिकांना अन्नधान्य व भाजीपाला वाटप करण्यात आले.

तसेच कोरोनामुळे अनेक पेशंटची गैरसोय होत असल्याने स्वस्त दरात रुग्णवाहिका लोकार्पण केली. तसेच वाढदिवसाच्या निमित्त सध्या रक्ताचा तुटवडा भासत असल्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. त्यामध्ये १७० रक्त पिशव्या संकलित केल्या. राष्ट्रवादी च्या महिला प्रदेश अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले.

यावेळी भूपेंद्र मोरे यांनी केलेल्यां सर्व उपक्रमाचे त्यांनी कौतुक करून भविष्यात त्यांना संधी नक्कीच मिळेल असा विश्वास चाकणकर यांनी केला.

यावेळी माजी नगरसेवक काकासाहेब चव्हाण खडकवासला मतदार संघ उपाध्यक्ष शरद दबडे पाटील यांनी ही वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी भूपेंद्र मोरे यांनी गोरगरिब व नागरिकांना आपल्या परीने सहकार्य केले आहे. इथून पुढेही विविध सामजिक उपक्रम राबवायचे आहात. जनसेवेत मिळणारा आशीर्वाद हीच मला मोठी भेट वाटते. या सर्व कार्यक्रमासाठी अध्यक्ष भाग्येश पाथरुडकर विठ्ठल सूर्यवंशी राजाभाऊ जाधव हरीश वैद्य लतीफ शेख यश शहा प्रतीक दारुंडे योगेश सुरवसे तुषार नरसाळे रोहित मोरे स्वप्नील करंदावने, मृणाल चावरुडे, राहुल मानकर, निखिल दबडे व इतर सर्व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. कोरोनाचे सर्व नियम पाळून कार्यक्रम संपन्न झाला.

# नऱ्हे येथील नागरिक सुविधांच्या प्रतीक्षेत

## राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क

धायरी : पुणे जिल्ह्यातील मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नऱ्हेगावात नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून पाणी, कचरा, नाले, रस्ते आदी मूलभूत सुविधांसाठी अजूनही झगडावे लागत आहे. विविध कामे प्रलंबित असूनही ग्रामपंचायत पदाधिकारी व अधिकारी नागरिकांच्या समस्येकडे दुर्लक्ष करीत असल्याने या पार्श्वभूमीवर पुणे शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सरचिटणीस भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत कार्यालयासमोर जनआक्रोश आंदोलन करण्यात आले.

२०११ च्या जनगणनेनुसार नऱ्हेगावची लोकसंख्या १६ हजार ९७४ इतकी आहे. मात्र प्रत्यक्षात दीड लाखाच्या आसपास लोकसंख्या आहे. या वर्षीचे नऱ्हेगावचे वार्षिक अंदाजपत्रक २४ कोटींचे आहे. दरवर्षी एकूण १२ कोटींच्या आसपास करवसुली होत असते, असे असतानाही ग्रामपंचायत नागरिकांना मूलभूत सुविधा देऊ शकत नाही. ही सर्वी शोकांतिका आहे.

- भूपेंद्र मोरे, सरचिटणीस, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पुणे शहर

नऱ्हेगावात पुणे शहरापेक्षा स्वस्तात फ्लॅट मिळत असल्याने शिवाय शहरापासून जवळ असल्याने बऱ्याच चाकरमान्यांनी या परिसरात फ्लॅट घेतले. गेल्या १० वर्षांत या परिसरातील लोकसंख्या झपाट्याने वाढली, त्याबरोबर ग्रामपंचायतीच्या करातही वाढ झाली. मात्र त्यामानाने नऱ्हेगावात पाणी, रस्ता, नाले, कचरा आदी समस्यांवर ग्रामपंचायतीने पूर्णपणे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप भूपेंद्र मोरे यांनी केला आहे. गतवर्षी नाले सफाई न केल्यामुळे अतिवृष्टीत आर्थिक नुकसान झाले होते.

लोकमत

# नऱ्हे येथील शिबिरात १७० बाटल्या रक्तसंकलन

धायरी : कोरोना रुग्णसंख्या वाढत असताना अपुऱ्या रक्तसाठ्याची समस्या निर्माण झाली आहे. यामुळे पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस भूपेंद्र मोरे यांनी नऱ्हे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिराचे उद्‌घाटन राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक

# कचराप्रश्नी नऱ्ह्यात आंदोलन

धायरी, ता. ७ : नऱ्हे येथील कचरा प्रश्न गंभीर झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे भूपेंद्र मोरे यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण गावामध्ये दवंडी देऊन आज आंदोलन करण्यात आले. यावेळी पालिकेचा निषेध व्यक्त करत सिंहगड रस्ता क्षेत्रीय कार्यालयातील सहाय्यक आयुक्त जयश्री काटकर यांना निवेदन देण्यात आले.



नऱ्हे : कचरा प्रश्न गंभीर झाल्याने आंदोलन करताना स्थानिक नागरिक.

नऱ्हे गाव पालिकेत समाविष्ट झाल्यापासून सात ते आठ दिवस कचऱ्याची गाडी येत नसल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग साठले आहेत. तसेच सोसायटीतील कचरा ही उचलला जात नाही. स्वच्छतेच्या नावाखाली कचरा गोळा करण्यासाठी असलेल्या खासगी ठेकेदार नागरिकांकडून पैशाची मागणी करत आहे. त्यामुळे नागरिक मनपा विरोधात संताप व्यक्त करत आहेत.

याबाबत डॉ. जयश्री काटकर म्हणाल्या, नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये कचऱ्यासाठी वाहनांची मागणी केली आहे. तोपर्यंत सध्या ग्रामपंचायतीची कचऱ्याची जुनी वाहन वापरून कचरा उचलण्याचे काम सुरू आहे. महानगरपालिकेकडून कुठल्याही प्रकारचा पैसे घेऊन खासगी ठेकेदार नेमण्यात आलेला नाही. हद्दीमध्ये फिरत असणाऱ्या ज्या गाडीमध्ये कचरा आणण्यात आला होता. त्या गाडीवर मनपाचे नाव असल्याने महानगरपालिका पैसे घेते असा नागरिक आरोप करत आहे. यामुळे मनपाची प्रतिमा मलिन होते. मनपाकडून त्या गाडीवर पोलिसांना कळवून कारवाई करण्यात येणार आहे. मोर्चात राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे महेश हांडे, खडकवासला मतदारसंघ अध्यक्ष काका चव्हाण, शरद दबडे, रोहिदास जोरी, भूपेश शुक्ला, योगेश टेकवडे, राजू जाधव, भाग्येश पाथरुडकर, संगीता भालेराव, मंदाकिनी ओव्हाळ आदी सहभागी झाले होते.

दि. ०८/०८/२०२१

लोकमत

# गाडीवाला आया तो कचरा निकाल...

## घरोघरी जाऊन उचलला कचरा; राष्ट्रवादी काँग्रेसचे अनोखे जनआरोग्य आंदोलन

लोकमत न्यूज नेटवर्क



### घरोघरी जाऊन केला कचरा गोळा...

- भूपेंद्र मोरे, सरचिटणीस, राष्ट्रवादी युवक काँग्रेस



# 'सिंहगड रोड भागातील समस्या दूर करणार'

खडकवासला : सिंहगड रोड, नऱ्हे भागातील नागरी समस्या दूर करण्यासाठी खासदार सुप्रिया सुळे यांनी पुढाकार घेतला आहे. नऱ्हे येथील महाराजा परिसरातील प्रश्नाबाबत खासदार सुळे यांनी तेथील नागरिकांशी चर्चा केली. पाणी, ड्रेनेज, रस्ता, कचरा, वाहतूक कोंडी आदी समस्यांकडे नागरिकांनी लक्ष वेधले. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना खा. सुळे यांनी याबाबत सूचना केल्या. राष्ट्रवादी काँग्रेसचे भूपेंद्र मोरे यांनी येथील समस्यांकडे लक्ष वेधले आहे. माजी नगरसेवक विकास दांगट पाटील, अक्रूर कुदळे, दत्तात्रय पायगुडे,

# नऱ्हे गावातील सिमेंटच्या रस्त्यांचे खड्डे बुजविले

## उत्कृष्ट दर्जाचे रस्ते करण्याची मागणी : महापालिकेला आली जाग

लोकमत इम्पॅक्ट

कल्याणराव आवताडे

लोकमत न्यूज नेटवर्क

धायरी : महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या नऱ्हे येथील मानाजीनगर रस्त्यावर मोठे खड्डे पडले असून, या खड्ड्यांचा त्रास वाहनचालकांना होत असल्याचे वृत्त 'लोकमत'ने प्रसिद्ध करताच महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी या वृत्ताची दखल घेत मानाजीनगर परिसरातील रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजविले आहेत. याबाबत राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर सरचिटणीस भूपेंद्र मोरे यांनी महापालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. सध्या महापालिकेच्या वतीने तात्पुरत्या स्वरूपात खड्डे बुजविले असले, तरी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.



### रात्र ठरत होती धोक्याची ....

विविध वर्तमानपत्रांनी घेतलेली दखल

न-हे व परिसरात राबविलेले विविध उपक्रम, शिबिरे व कार्यक्रम तसेच जनसामान्यांची कामे करताना केलेली आंदोलने, काढलेले मोर्चा व दिलेली निवेदने याची विविध दैनिकांची घेतलेली दखल.



सेवा संकल्प विकास









## कबड्डी स्पर्धा

मा.शरदचंद्रजी पवार साहेबांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त जिल्हास्तरीय अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

सेवा संकल्प विकास










## शरीरसौष्ठव स्पर्धा

बॉडी बिल्डर्स अँड फिटनेस असोसिएशन, पुणे
आणि  शिवराज्य समूह, पुणे शहर यांच्या
संयुक्त विद्यमानाने मा.ना.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब
यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र
बॉडी बिल्डींग असोसिएशन संलग्न
पुणे जिल्हा हौशी शरीरसौष्ठव संघटना

सेवा संकल्प विकास













# आषाढी वारकरी सोहळा

दरवर्षी शिवराज्य समुह, पुणे शहर
च्या माध्यमातून वारकऱ्यांना पाण्याचे
टँकर उपलब्ध करून देण्यात येतात.
तसेच विविध वारकरी संप्रदायास
भेटी देवून आशिर्वाद घेतले.

सेवा संकल्प विकास














मोफत नेत्र तपासणी
मोफत मोतीबिंदु
शस्त्रक्रिया

सेवा
संकल्प
विकास






दूरदर्शी
विचारसरणी

नवले ब्रिजजवळ झालेल्या
दुर्घटनेनंतर दिशाफलक व
माध्यमांद्वारे जनहितार्थ याचिका

सेवा
संकल्प
विकास





## स्वप्नपुर्ती महिला फाऊंडेशन

स्वप्नपूर्ती महिला फाऊंडेशन मार्फत महिलांसाठी बचत गटांची स्थापना व त्यांचे वेळोवेळी नियोजन

सेवा संकल्प विकास





# रक्षाबंधन

प्रभागातील सुमारे ५००० माता –भगिनींकडून राखीचा मान

सेवा संकल्प विकास










# नागरी सन्मान

समाजात करीत असलेल्या
कामाची पोचपावती
म्हणुन सेवाकार्यासाठी प्राप्त
झालेले पुरस्कार










# ठिया आंदोलन

वाढीव वीजबिलाबाबत मोर्चा व
महावितरण अधिकाऱ्यांकडून
सल्लामसलत करून बीलाची
रक्कम कमी करण्यात यश

सेवा
संकल्प
विकास







# नवरात्र

नवरात्रीदरम्यान भव्य
रास दांडीया महोत्सवाचे
आयोजन व त्यासाठी जमलेला
तमाम जनसमुदाय

सेवा
संकल्प
विकास








# रोजगार मेळावे

प्रभागातील तरूण तरूणांना
तसेच नागरीकांना नोकरीचा प्रश्न
भेडसावत असताना
यशस्वीरीत्या जॉब कार्डचे वाटप करून हजारो
नागरीकांना जॉब चे हस्तांतरण करण्यात
मोठ्या प्रमाणात यश आले.

सेवा
संकल्प
विकास









## एक पाऊल नशामुक्तीसाठी

प्रभागातील तरूणांना व्यसनांपासून
कसे व का लांब रहावे यासाठी
व्यसनमुक्ती केंद्रांमार्फत
सुयोग्यरीत्या मार्गदर्शन

सेवा
संकल्प
विकास









## न्याय व हक्कांसाठी पाठपुरावा

महानगरपालिका अंतर्गत समाविष्ट
गावांमधील महिला कर्मचाऱ्यांचे
थकीत पगार संदर्भात निवेदन देऊन
त्यांना स्वहक्काचे पगार
मिळवून देण्यात आले.

सेवा
संकल्प
विकास